शेठ टी.जे. एज्युकेशन सोसायटीचे

शेठ एन्.के.टी.टी. वाणिज्य महाविद्यालय व शेठ जे.टी.टी. कला महाविद्यालय, ठाणे.

दिनांक : २९ ऑगस्ट, २०१९

## सूचना

## (Post Matric Scholarship for Students with Disabilities)

विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मार्फत **अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०१९-२०** नुसार **अपंग** विद्यार्थ्यांकरिता ही योजना राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी नवीन शिष्यवृत्तीसाठी **१८७९** संच निर्धारित केले आहेत.

### किमान पात्रता व अटी :

(१) अर्जदार हा **भारताचा रहिवासी** असावा.

(२) अर्जदाराची अपंगत्वाची टक्केवारी **४०%** व त्यापुढील असावी.

(३) अर्जदार मागील वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.

(४) अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा/स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा

(५) अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित **वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. २.५० लाख** इतकी आहे.

(६) एका कुटूंबातील फक्त **दोन अपंग अपत्यांनाच** सदर योजनेचा लाभ घेता येईल.

(७) विद्यार्थ्याने कोणत्याही **राष्ट्रीयीकृत बँकेत स्वतःचे खाते उघडणे** आवश्यक आहे. विद्यार्थ्याला मंजुर होणारी शिष्यवृत्तीची रक्कम ही त्याच्या बँक खात्यावरच जमा करण्यात येणार आहे. तसेच हे खाते आधार कार्डशी संलग्न (link) करणे आवश्यक आहे.

(८) एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल / वसूल केली जाईल.

### अर्ज करण्याची पद्धत (नविन मंजुरी/नुतनीकरण) :

(१) इच्छुक विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

(२) ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या homepage वरील Frequently Asked Questions (FAQs) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

(३) ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालयाशी संपर्क साधुन सदर अर्ज महाविद्यालयाच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.

(४) ऑनलाईन अर्ज भरुन होताच विद्यार्थ्यांनी त्याची प्रिंट घ्यावी व त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे **(फोटो, मागील वर्षाची गुणपत्रिकेची छायांकित प्रत, पालकांचे शासनाच्या सक्षम प्राधिकारी यांचेकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र, फी पावती, बँक पासबुक पहिल्या पानाची झेरॉक्स, राज्य शासनाच्या सक्षम वैद्यकीय अधिका-याने प्रमाणित केलेला अपंगत्वाचा दाखला, बोनाफाईड सर्टिफिकेट, आधार कार्ड झेरॉक्स)** जोडून आपल्या महाविद्यालय / संस्थेमध्ये पुढील कार्यवाहीसाठी **३१/१०/२०१९ पर्यंत नवीन शिष्यवृत्ती करिता (Fresh) व नुतनीकरण शिष्यवृत्तीकरिता (Renewal)** सादर करावीत.

**टीप :** विद्यार्थ्यांना उपरोक्त फॉर्म भरण्याबाबत कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत श्री. डी.एन्. पवार यांच्याशी संपर्क साधावा.

प्रभारी प्राचार्या